असा. क्र. १२ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

बुधवार, मार्च ३, २००४/फाल्गुन १३, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

### अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
| --- | --- |
| सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.––महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. .. | ६३–६५ |


### संसदीय कार्य विभाग

मंत्रालय, मुंबई-४००-०३२, दिनांक ३ मार्च २००४.

**MAHARASHTRA ORDINANCE No. III OF 2004.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS (REMOVAL OF DISQUALIFICATIONS) ACT.

**सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५६ चा मुंबई ५२. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) (सुधारणा) अध्यादेश, २००४ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

राज्य विधानमंडळाच्या सदस्यत्वाच्या निरर्हतेस प्रतिबंध.

**२.** एखादी व्यक्ती, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. विनिमं. २००३/प्र.क्र. १/सां. का.-२, दिनांक ११ फेब्रुवारी २००३ आणि शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. विनिमं. २००३/प्र.क्र. १/सां. का.-२, दिनांक २१ जुलै २००३ अन्वये पुनर्रचित केलेले महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ याच्या अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद धारण करते, केवळ याच कारणामुळे ती महाराष्ट्र विधानसभा किंवा महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य म्हणून निवडली जाण्यास किंवा असण्यास निरर्ह ठरणार नाही ; आणि त्यानुसार महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियमाच्या अनुसूची एक मधील, नोंद क्रमांक २२ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :— १९५६ चा मुंबई ५२.

" **२३.** महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ याच्या अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद. ".

## निवेदन.

मराठी विश्वकोश तयार करण्याकरिता व प्रसिद्ध करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. विनिमं. २००३/प्र.क्र. १/सां. का.-२, दिनांक ११ फेब्रुवारी २००३ आणि शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. विनिमं. २००३/प्र.क्र. १/सां. का.-२, दिनांक २१ जुलै २००३ यांअन्वये महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ पुनर्रचित केले आहे. उक्त मंडळाचा अध्यक्ष दरमहा रु. ५,००० एवढे मानधन मिळण्यास पात्र आहे, तसेच, त्यांना बैठक भत्ता, वाहनचालकासह शासकीय वाहन, निवास व कार्यालय येथे दूरध्वनी, कार्यालयीन प्रयोजनार्थ केलेला प्रवास किंवा दौरे यांच्यासाठी प्रवास व दैनिक भत्ता व विवक्षित इतर भत्ते मिळण्याची देखील तरतूद केलेली आहे. तसेच, उक्त मंडळाच्या सदस्याला सुद्धा मंडळांच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी बैठक भत्ता, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता या सुविधा देखील अनुज्ञेय आहेत.

मराठी विश्वकोश निर्मितीचे व प्रसिद्धीचे काम करण्यासाठी सखोल ज्ञान व संशोधक वृत्ती तसेच मराठी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक असते. म्हणून, उक्त मंडळाचा अध्यक्ष किंवा सदस्य या पदावर अभ्यासू व विद्वान व्यक्तीची नेमणूक केली जाते.

तथापि, वर उलेख केलेल्या सुविधा व तसेच त्या पदांना देण्यात येणारे मानधन यामुळे ही पदे राज्याच्या नियंत्रणाखाली येणारे लाभदायक पद ठरू शकेल आणि परिणामी, संविधानाच्या अनुच्छेद १९१ याच्या खंड (१) उप-खंड (क) मधील, राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून निवडली जाण्यास किंवा असण्यास निरर्ह ठरविण्याशी संबंधीत तरतुदी त्यांना लागू होऊ शकतील. परिणामी पात्र व विद्वान व्यक्ती उक्त पदे स्वीकारण्यापासून परावृत्त होऊ शकतील आणि त्यांच्या ज्ञानाचा लाभ घेण्यापासून राज्य वंचित राहू शकेल.

ही बाब विचारात घेता, राज्य शासनास असे वाटते की, केवळ उक्त पद धारण केली आहेत एवढ्याच कारणास्तव असे पद धारण करणारी व्यक्ती ही राज्य विधानमंडळाचे सदस्य म्हणून निवडून येण्यास, किंवा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरू नयेत. म्हणून, अशी पदे धारण करणारी व्यक्ती राज्य विधानमंडळाचे सदस्य म्हणून निवडून येण्यास, किंवा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरणार नाहीत असे जाहीर करणे आणि त्याकरिता महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम (१९५६ चा मुंबई ५२) याच्या कलम २ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीमध्ये उक्त पदे अंतर्भूत करण्याकरिता आणि अशा पदांचे धारक हे उक्त अनुच्छेद १९१(१)(क) अनुसार निरर्ह ठरू नये याकरिता, त्या अधिनियमात सुधारणा करणे शासनास इष्ट वाटते.

**२.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम (१९५६ चा मुंबई ५२), यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २८ फेब्रुवारी २००४.

**मोहम्मद फजल,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रतिमा उमरजी,**
शासनाच्या प्रधान सचिव.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, मार्च ३, २००४/फाल्गुन १३, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.


## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Legislature Members (Removal of Disqualifications) (Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. III of 2004), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Legislature Members (Removal of Disqualifications) (Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. III of 2004), published under the authority of the Governor.].

**PARLIAMENTARY AFFAIRS DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 3rd March 2004.

**MAHARASHTRA ORDINANCE No. III OF 2004.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Legislature Members (Removal of Disqualifications) Act.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Legislature Members (Removal of Disqualifications) Act, for the purposes hereinafter appearing ;

Bom. LII of 1956.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Legislature Members (Removal of Disqualifications) (Amendment) Ordinance, 2004.

(*2*) It shall come into force at once.

Prevention of disqualification of Membership of State Legislature.

**2.** A person shall not be disqualified for being chosen as, or for being, a member of the Maharashtra Legislative Assembly or the Maharashtra Legislative Council, merely by the reason of the fact that he holds the office of the Chairman or Member of the Maharashtra State Marathi Encyclopaedia Production Board, reconstituted by the Government of Maharashtra by Government Resolution, Social Justice, Cultural Affairs, Sports and Special Assistance Department, No. VNM-2003/CR 1/C.A.-2, dated the 11th February 2003 read with Government Resolution, Social Justice, Cultural Affairs, Sports and Special Assistance Department, No. VNM-2003/CR-1/C.A.-2, dated the 21st July 2003; and accordingly, in Schedule I to the Maharashtra Legislature Members (Removal of Disqualifications) Act, after entry 22, the following entry shall be added, namely :— Bom. LII of 1956.

" 23 . The office of the Chairman or Member of the Maharashtra State Marathi Encyclopaedia Production Board, established by the Government of Maharashtra.".

## STATEMENT

The Maharashtra State Marathi Encyclopaedia Production Board has been reconstituted by the Government of Maharashtra, under the Government Resolution, Social Justice, Cultural Affairs, Sports and Special Assistance Department, No.VNM-2003/CR 1/C.A.-2, dated the 11th February 2003 read with Government Resolution, Social Justice, Cultural Affairs, Sports and Special Assistance Department, No.VNM-2003/CR-1/C.A.-2, dated the 21st July 2003, for the purposes of the preparation and publication of the Marathi Encyclopaedia. The Chairman of the said Board is entitled to the honorarium of Rs. 5,000 per month and also provided with certain other facilities like sitting allowance, chauffeur driven Government vehicle, telephone at residence and office and travelling and daily allowances for the journeys undertaken for official purposes or official tours and certain other allowances. The members of the said Board are also entitled for sitting allowance and travelling and daily allowances for attending the meetings of the Board.

The work of preparation and publication of the Marathi Encyclopaedia requires vast knowledge and aptitude for research as well as mastery over the Marathi language. Therefore, learned and scholarly persons are appointed on the post of the Chairman or Member of the said Board.

However, the above facilities alongwith the payment of honorarium might make the said offices as an office of profit under the State Government and attract the provisions of article 191(1)(a) of the Constitution relating to the disqualification for being chosen, or for being a Member of the State Legislature under the said article, discouraging some worthy and learned person from accepting the said offices and depriving the State from benefitting from their knowledge.

In view of this, it is felt by the Government that only on account of holding of such office, the bearer of such office should not incur disqualification for being chosen, or for being a Member of the State Legislature. Therefore, Government considers it expedient to declare that the holders of the said offices shall not incur any disqualification for being chosen, or for being a Member of the State Legislature, on account of holding the said offices and for that purpose to amend the Maharashtra Legislature Members (Removal of Disqualifications) Act (Bom. LII of 1956), and incorporate the said offices in the Schedule I to the said Act as provided by section 2 of the said Act, so as to save the holders of such offices from incurring any disqualification by virtue of the said article 191 (1)(a).

2. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that the circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Legislature Members (Removal of Disqualifications) Act (Bom. LII of 1956), this Ordinance is promulgated.

Mumbai,                                        MOHD. FAZAL,

Dated the 28th February 2004.          Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Principal Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई